**गोपनीय**

**क्रमांक : का.स./बैठक/२४१**

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : १३ मार्च, २०१४

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २२ फेब्रुवारी, २०१४ रोजी झालेल्या २४१व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

**सचिव,**
**कार्यकारी समिती**

**प्रति :**

मुख्य सचिव,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२. - अध्यक्ष

श्री. द. म. सुकथनकर
"प्रिया", वरळी सी फेस,
वरळी, मुंबई - ४०० ०१८. - सदस्य

श्री. ना. वि. मिराणी
ए/४७, आदर्श नगर,
वरळी, मुंबई - ४०० ०१८. - सदस्य

डॉ. शिरीष संख्ये
संचालक, मेकॅन्सी अँड कंपनी,
एक्सप्रेस टॉवर, २१ वा मजला,
नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१. - सदस्य

प्रधान सचिव (१),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२. - सदस्य

..२/-

महापालिका आयुक्त, - सदस्य
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ४०० ००१.

प्रधान सचिव, - सदस्य
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

व्यवस्थापकीय संचालक, - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

महानगर आयुक्त - सदस्य
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

**निमंत्रित :**

प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

**प्रत अग्रेषित :-**
विधी सल्लागार, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची २४१ वी बैठक

**दिनांक :** **२२ फेब्रुवारी, २०१४ (शनिवार)**

**वेळ :** **सकाळी ११.०० वाजता**

**स्थळ :** **मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,**
**सहावा मजला, मंत्रालय**
**मुंबई - ४०० ०३२.**

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री. ज. स. सहारिया<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री. मनुकुमार श्रीवास्तव<br>प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग | - | सदस्य |
| श्री. देबाशिष चक्रबर्ती<br>प्रधान सचिव,<br>गृहनिर्माण विभाग | - | सदस्य |
| श्री. सिताराम कुंटे<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री. यु.पी.एस. मदान<br>महानगर आयुक्त,<br>मुं.म.प्र.वि.प्राधिकरण | - | सदस्य |

**निमंत्रित :**

श्री. श्रीकांत सिंह
प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग
व
प्रधान सचिव (विशेष प्रकल्प) (अति.कार्यभार),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन

श्री. संजय सेठी
अति.महानगर आयुक्त (१)/प्रकल्प संचालक,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. पी. आर. के. मूर्ती
प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

..२/-

श्रीमती उमा अडुसुमिली
प्रमुख, नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. डी. संपतकुमार
प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. सु. ल. पिंपळखुटे
वित्त सल्लागार, वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. श. म. सबनीस
मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. स. भ. तामसेकर
मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. वि. ग. पाटील
प्रमुख, सामाजिक विकास कक्ष,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. अ. रा. वानखेडे
उप महानगर आयुक्त (भूमी / मिळकत)
भूमी शाखा, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. दि. न. कवठकर
सह प्रकल्प संचालक (जनसंपर्क) आणि
उप महानगर आयुक्त (प्रशासन) (अति.कार्यभार),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. एस. सी. देशपांडे
सह-प्रकल्प संचालक (नगर नियोजन),
माहिती व तंत्रज्ञान कक्ष,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. उ. गं. भार्गव
सचिव, कार्यकारी समिती (अति.कार्यभार),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

बैठकीच्या सुरुवातीस, प्राधिकरणाच्या वतीने मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांचे महानगर आयुक्त यांनी स्वागत केले.

त्यानंतर, मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत केले.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**<u>बाब क्र.१ :</u>** **<u>प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २८ नोव्हेंबर, २०१३ रोजी झालेल्या २४०व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.</u>**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**<u>बाब क्र.२ :</u>** **<u>प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २८ नोव्हेंबर, २०१३ रोजी झालेल्या २४०व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.</u>**

कार्यकारी समितीच्या दिनांक २८ नोव्हेंबर, २०१३ रोजी झालेल्या २४०व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील बाब क्र.९ विस्तारीत मुंबई नागरी पायाभुत सुविधा प्रकल्पातंर्गत अतिरिक्त कामाना प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबतच्या कार्यवाही अहवालावर चर्चा करताना सदर प्रकल्पाचे सादरीकरण करण्यात येऊन त्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली :-

१. या विषयावर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, दिनांक २८ नोव्हेंबर, २०१३ रोजी झालेल्या कार्यकारी समितीच्या २४० व्या बैठकीमध्ये रु. १९०४.०० कोटी किमतीच्या १२ कामांच्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यतेसाठी शिफारस देण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. या १२ कामांमधील "मानकोली मोटागांव रस्त्यावरील मोटागांव येथे उल्हासखाडीवर चौपदरी पुल व रस्त्याचे बांधकाम करणे" व "कल्याण भिवंडी राष्ट्रीय महामार्ग क्र. २२२ वर उल्हास खाडीवर दुर्गाडी येथे चौपदरी पुल बांधणे" ही दोन कामे वगळता उर्वरीत १० कामांना ठराव क्र. १२५० अन्वये रु. १६५८.०० कोटी किमतीच्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यतेसाठी प्राधिकरणाकडे शिफारस करण्यात आली होती व सदर दोन कामांची व्याप्ती, तांत्रिक बाबी व काम अंतर्भूत करण्यासबंधीची कारणमिमांसा इ. दर्शविणा-या बाबतचे कार्यकारी समितीच्या बैठकीमध्ये सादरीकरण करण्यात यावे अशी सूचना करण्यात आली होती. या अनुषंगाने महानगर आयुक्त यांनी वरील दोन कामांचे विस्तृत सादरीकरण सदर बैठकीत करण्यात आले.

२. मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी दुर्गाडी किल्ल्याजवळील उल्हास नदीवरील अस्तिवातील पुलाबाबत विचारणा केली असता महानगर आयुक्त यांनी सांगितले की, सदर पूल सन २००२ मध्ये बांधण्यात आला असून हा पूल दोन मार्गीकांसाठी आहे. नव्याने बांधण्यात येणारा प्रस्तावित पूल २+२ मार्गिकांसाठी प्रस्तावित करण्यात आला आहे. कार्यकारी

समितीचे सदस्य श्री. मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव (१) व श्री. श्रीकांत सिंह, प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग यांनी असे सुचविले की, प्रस्तावित पुलांचे बांधकाम २ + २ मार्गिकांसाठी करण्याऐवजी भविष्यातील होणारी वाहतूकीची वाढ लक्षात घेता सदर पूल ३ + ३ मार्गिकांसाठी बांधण्याबाबत विचार करण्यात यावा.

३. त्यानंतर महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मुंब्रा डोबिंवली - भिवंडी या रस्त्याबाबत ४ वेगवेगळे पर्याय तपासण्यात आले व त्यांचे सादरीकरणही करण्यात आले. त्यातील पर्याय क्र.४ मोटागांव मानकोली जोड रस्ता व पूल हा सर्वात किफायतशीर व योग्य असल्याचे मान्य करण्यात आले. कार्यकारी समितीचे सदस्य श्री. सिताराम कुंटे, महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी मानकोली मोटागांव येथील पूल व रस्ता प्रस्तावित २ + २ मार्गिकांऐवजी ३ + ३ मार्गिकांचा बांधण्यात यावा अशी सूचना केली व ही सूचना कार्यकारी समितीने मान्य केली.

४. उपरोक्त सुचनेनुसार संबंधित कामांच्या मुळ व्याप्तीत बदल करुन यापूर्वी सादर केलेल्या अनुक्रमे रु.१८०.०० कोटी व रु.६६.०० कोटी रक्कमेच्या प्रस्तावात वाढ होणार आहे. यास्तव दोन्ही कामांच्या अंदाजपत्रकात सुधारणा करुन आता मानकोली मोटागांव रस्त्यावरील मोटागांव येथे उल्हासखाडीवर सहापदरी पुल व रस्त्यांचे बांधकाम करणे या कामाकरीता रु. २४५.०० कोटी किंमतीचे तसेच कल्याण भिवंडी राष्ट्रीय महामार्ग क्र.२२२ उल्हास खाडीवर दुर्गाडी येथे सहापदरी पुल बांधणे या कामाकरीता रु.८५.०० कोटी किंमतीचे नव्याने अंदाजपत्रक तयार केले आहे. त्याचप्रमाणे कल्याण शहर वळण रस्ता बांधणे आणि शिरगांव फाटा ते रा.म.क्र.३५ वरील बदलापुर जोडणारा रस्ता बांधणे या रस्त्यांच्या कामांची अंदाजित किंमत अनुक्रमे रु.४४० कोटी व ३५० कोटी इतकी दोन पदरी रस्त्याच्या व्याप्तीसाठी प्राधिकरणाने कार्यकारी समितीकडे शिफारस केली होती. परंतू रा.म.क्र. ४० व रा.म.क्र. ३५ यांचे चार पदरी करीता रस्ता रुंदीकरण प्राधिकरणातर्फे प्रगतीपथावर असल्यामुळे तसेच रा.म.क्र. ३ वरील वाहतुक वर्दळीचा विचार करता वरील दोन कामे ही दळणवळण व वाहतुकीसाठी महत्वाचे असलेले जोडमार्ग असल्याने सदर रस्त्यांची सुधारणा दुपदरी ऐवजी चौपदरी करणे आवश्यक आहे. त्यामुळे या कामांच्या मुळ व्याप्तीत सदर बदल करुन यापूर्वी सादर केलेल्या अनुक्रमे रु.४४०.०० कोटी व रु.३५० कोटी रक्कमेच्या अंदाजपत्रकात सुधारणा करुन आता चौपदरी रस्त्यांकरीता अनुक्रमे रु. ५७८.०० कोटी व रु. ४९५.०० कोटी किंमतीची सुधारीत अंदाजपत्रके तयार केली आहेत.

त्यानुसार खालील कामांसाठीची अंदाजित मुळ किंमत व सुधारित किंमत दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित मुळ किंमत (रु.कोटीत) | सुधारित किंमत (रु.कोटीत) |
|---|---|---|---|
| १ | मानकोली मोटागांव रस्ता व उल्हास खाडीवरील पुल | १८०.०० | २४५.०० |
| २ | कल्याण भिवंडी राष्ट्रीय महामार्ग क्र.२२२ वर उल्हास खाडीवर दुर्गाडी येथे सहापदरी पुल | ६६.०० | ८५.०० |
| ३ | कल्याण शहर वळण रस्ता बांधणे. | ४४०.०० | ५७८.०० |
| ४ | रा.म.क्र. ४० वरील शिरगांव फाटा ते रा.म.क्र.३५ वरील बदलापूर जोडणारा रस्ता बांधणे (चौपदरी) | ३५०.०० | ४९५.०० |
| | **एकूण ४ कामे** | **१०३६.००** | **१४०३.००** |

उपरोक्त अंदाजपत्रकास कार्यकारी समितीने संमती दर्शविली असून प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी शिफारस केली आहे.

**निर्णय :** **त्यानंतर, कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

**बाब क्र.३ :** **विस्तारित मुंबई नागरी पायाभुत सुविधा प्रकल्पांतर्गत कटाई नाका बदलापूर राज्य मार्ग ४३ या सुधारीत कामाच्या वावास मंजूरी मिळणेबाबत.**

३.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, दिनांक ०८ सप्टेंबर, २०११ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या १२९ व्या बैठकीत ठराव क्र. १२६४ अन्वये कटाई नाका-बदलापूर या रु. ९०.८० कोटी रक्कमेच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम दरसुची सन २०१०-२०११ वर आधारीत रु.८२.९४ कोटी किंमतीच्या अंदाजपत्रकीय रक्कमेस तांत्रिक मान्यता देण्यात आली. सदर कामाच्या खुल्या निविदा मागवून त्या निविदांना दिनांक ११ जानेवारी, २०१२ रोजी झालेल्या कार्यकारी समितीच्या २३३व्या बैठकीत ठराव क्र.११९७ अन्वये मेसर्स अजवानी इन्फ्रास्ट्रकचर प्रा.लि. यांची निविदा ७.७७ टक्के कमी दराने रु.७६.४९ कोटी किंमतीस मान्यता देण्यात आली.

३.२ त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी, सदरच्या कामाच्या व्याप्तीमध्ये होणारी वाढ व त्या अनुषंगाने किंमतीतील वाढ यांची कारणमिंमासा खालीलप्रमाणे विषद केली :-

३.२.१ **सेवा वाहिन्या स्थलांतरीत करणे:**

कुळगांव बदलापूर नगरपरिषदेच्या भागामध्ये रस्ता रुंदीकरण करीत असतांना विजेचे खांब व ट्रान्सफार्मर मोठया प्रमाणावर असल्यामुळे सदरच्या सेवा वाहिन्या स्थलांतरीत करणे आवश्यक होते त्यानुसार यापोटी रु. ८.३१ कोटी रक्कमेची निविदा किमंतीमध्ये वाढ होत आहे.

३.२.२ **भुगर्भ सर्वेक्षण :**

कामाच्या वावामध्ये पुलांच्या ठिकाणी भुगर्भ सर्वेक्षण करणे आवश्यक असल्यामुळे व कामाच्या वावामध्ये अतिरीक्त भुगर्भ सर्वेक्षण ही बाब नसल्यामुळे रु.०.०५ कोटी किमंतीचा समावेश करण्यात आला आहे.

३.२.३ **वेज शिअर इलेमेंट लेअर**

साखळी क्र.१२/९०० ते साखळी क्र.१५/००० या लांबीतील रस्ता पावसाळयामध्ये दरवर्षी खराब होत असल्यामुळे भुगर्भ तज्ञ प्राध्यापक जी.बी. चौधरी यांचे मत घेण्यात आले होते. त्यांच्या सल्ल्यानुसार वेज शिअर इलेमेंट लेअर करण्यात आले या अतिरिक्त कामास रु. २.५३ कोटी खर्च येत आहे.

३.२.४ **पाणी वाहून नेण्याच्या प्रणालीमध्ये सुधारणा करणे.**

कामाच्या मुळ व्याप्तीमध्ये समावेश असलेल्या सी.डी. वर्क्सच्या संख्येमध्ये सभोवतालच्या भौगोलिक परिस्थितीमुळे वाढ झाल्यामुळे (२० ऐवजी ७८) मंजुर झालेल्या किमंतीमध्ये रु. २.४९ कोटी रूपयांची वाढ झाली आहे.

३.३ कार्यकारी समितीचे निमंत्रित श्री. श्रीकांत सिंह, प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग यांनी विचारणा केली की, सदर बाबी अंदाजपत्रक तयार करताना का विचारात घेण्यात आल्या नाहीत? तसेच वरील बाबींची कारणमीमांसा सल्लागाराचे अभिप्रायासह सादर करावी.

**निर्णय : त्यानंतर, बाब टिप्पणीमधील प्रस्ताव स्थगित ठेवून सदर प्रस्ताव पुन्हा कार्यकारी समितीच्या आगामी बैठकीत सादर करण्यास सांगितले.**

**बाब क्र.४ : विस्तारित मुंबई नागरी पायाभुत सुविधा प्रकल्पांतर्गत ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील लाल बहादुर शास्त्री मार्ग व महात्मा गांधी मार्ग यावरील उड्डाणपुलांच्या कामांचे सुधारित अंदाजपत्रकीय रक्कमेस मान्यता देणे.**

४.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सागितले की, दिनांक २४ डिसेंबर, २००७ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या १२० व्या बैठकीमध्ये प्राधिकरणाने विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत रस्त्यांची सुधारणा करणे, उड्डाणपूल बांधणे इ. कामांकरीता ठराव क्र. ११४८अन्वये रु.१४९३.२६ कोटी रक्कमेस मान्यता दिली असून सदर मान्यतेमध्ये ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील लाल बहादूर शास्त्री मार्गावर मिनाताई ठाकरे चौक व हरि निवास जंक्शन - तीन पेट्रोल पंप आणि महात्मा गांधी मार्गावरील टेलिफोन एक्सचेंज जंक्शन या तीन ठिकाणी उड्डाणपूल बांधणे या कामाचा समावेश आहे.

..७/-

प्राधिकरणाच्या मान्यतेनुसार सदर काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचेमार्फत कार्यान्वित करणे प्रस्तावित होते. या कामाची प्रशासकीय मान्यता रक्कम रु. ५९.३१ कोटी ही महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी सादर केलेल्या ठोक अंदाजपत्रकिय किंमतीवर आधारीत होती. मात्र प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यापूर्वी त्यांनी या कामाचे सखोल सर्व्हेक्षण करुन व प्रत्यक्ष परिस्थिती अनुरुप कामांचे आराखडे तयार केले. या आराखडयांनुसार सदर कामाच्या सविस्तर प्रकल्प अहवालानुसार अंदाजित खर्च रु.१०२.०० कोटी होता. सदर अंदाजित खर्चावर आधारीत उड्डाणपूल बांधण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी निविदाही मागविल्या होत्या.

४.२ महानगर आयुक्त यांनी कार्यकारी समितीच्या असे निदर्शनास आणले की , सदरची कामे ठाणे महानगरपालिकेमार्फत केल्यास सुलभपणे व योग्य समन्वयाने जलद गतीने पूर्ण करता येतील असे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी दिनांक १८ जुलै, २००९ रोजीच्या पत्रान्वये प्राधिकरणास कळविले आहे. त्यानुसार ठाणे महानगरपालिकेची या कामांसाठी दिनांक १० ऑगस्ट, २०१० रोजी कार्यान्वित संस्था म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत नेमणूक करण्यात आली. ठाणे महानगरपालिकेने वरील तीनही ठिकाणी स्वतंत्र उड्डाणपूल न बांधता हरीनिवास ते मिनाताई ठाकरे चौक असा उन्नतमार्ग व टेलिफोन एक्सचेंज येथील उड्डाणपूल बांधण्याचा रु. २५६.२३ कोटी रक्कमेचा प्रस्ताव मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे जानेवारी, २०११ मध्ये सादर केला. सदर प्रस्तावातील रॅम्पचे ठिकाणी स्लीप रोडसाठी पुरेशी रुंदी उपलब्ध नसणे व इतर तांत्रिक अडचणी, तसेच हा प्रस्ताव मुळ प्रस्तावापेक्षा पुर्णतः नवीन असल्याने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने ठाणे महानगरपालिकेचा उन्नतमार्गाचा प्रस्ताव प्राधिकरणास स्विकार्य नसल्याचे कळविले. त्यानुसार ठाणे महानगरपालिकेने मागविलेल्या निविदा रद्द करण्यात आल्या.

४.३ त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी असेही निदर्शनास आणले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सुचविलेल्या बाबींनुसार ठाणे महानगरपालिकेने प्रस्तावात सुधारणा करुन उन्नतमार्गाऐवजी तीन ठिकाणी स्वतंत्र उड्डाणपूल बांधण्याचा सुधारीत प्रस्ताव सादर केला. मुळ मान्यतेतील हरीनिवास - तीन पेट्रोल पंप या ठिकाणी वाहतूक पोलिसांनी केलेल्या एकेरी वाहतूक नियमनामुळे वाहतुक कोंडी दुर झाली आहे. त्यामुळे सुधारीत प्रस्तावात हरीनिवास - तीन पेट्रोल पंप या ठिकाणचा उड्डाणपूल वगळून याच मार्गावरील अल्मेडा चौक येथे उड्डाणपूल नव्याने प्रस्तावित करण्यात आला. सुधारीत प्रस्तावानुसार मिनाताई ठाकरे चौक, अल्मेडा जंक्शन आणि टेलिफोन एक्सचेज (महात्मा गांधी रस्ता) चौक या तीन ठिकाणी स्वतंत्र उड्डाणपूल प्रस्तावित करण्यात आले आहेत. या प्रस्तावास प्राधिकरणाकडून तत्वतः मंजूरी मिळाल्यानंतर ठाणे महानगरपालिकेकडून या प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल प्राधिकरणाकडे डिसेंबर,

२०१३ मध्ये मंजूरीसाठी सादर करण्यात आला. सुधारीत प्रस्तावानुसार या कामाची एकुण अंदाजपत्रकीय रक्कम रु. १७३.०३ कोटी व प्रशासकीय मान्यता रक्कम रु. २०८.०२ कोटी इतकी आहे.

४.४ महानगर आयुक्त यांनी पुढे अशीही माहिती दिली की, ठाणे महानगरपालिकेच्या प्रस्तावानुसार प्रत्यक्ष जागेवरील काम करण्यास येणा-या अडीअडचणी तसेच वाहतूकीस जास्त कालावधीसाठी बाधा न येऊ देण्याच्या कारणास्तव उड्डाणपूलाचा गाळा किमान ३० मी. प्रस्तावित करण्यात आला असून कॉंक्रिट गर्डर ऐवजी स्ट्रक्चरल स्टीलचे गर्डर प्रस्तावित करण्यात आले आहे. त्यामुळे बांधकाम खर्चात वाढ होत असली तरी कामाच्या कालावधीत व नागरीकांना होणा-या असुविधेतील बचत यामुळे सदर प्रस्ताव संयुक्तिक असल्याचे दिसुन येते. या प्रस्तावानुसार मिनाताई ठाकरे चौक (लांबी १४१२ मी.) व अल्मेडा चौक (लांबी ५९५ मी.) येथील उड्डाणपूल ऐकेरी दिशेच्या वाहतुकीसाठी असून यांची रुंदी ७.५ मीटर इतकी आहे तर टेलिफोन ऐक्सचेंज (लांबी ७९० मी.) येथील उड्डाणपूल दुहेरी दिशेच्या वाहतुकीसाठी असून याची रुंदी ८.५ मीटर इतकी आहे. ठाणे महानगरपालिकेने सादर केलेला अंदाजखर्च रु.२०८.०२ कोटी हा सन २०१२-१३ च्या दरसूचीवर आधारीत असून रस्त्यावरील दिवाबत्तीसाठी व सेवावाहिन्यांचा खर्च ठाणे महानगरपालिकेनेच करणे योग्य असल्याने सदरचा खर्च वगळला असून प्रकल्पाच्या अंदाजित खर्चाचा तपशिल महानगर आयुक्त यांनी पुढील प्रमाणे सादर केला :-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | लाल बहाद्दूर शास्त्री मार्गावरील मिनाताई ठाकरे चौक येथे उड्डाणपूल बांधणेच्या स्थापत्य कामाचा अंदाजित खर्च | : | रु.९२.८६ कोटी |
| २ | लाल बहाद्दूर शास्त्री मार्गावरील अल्मेडा चौक येथे उड्डाणपूल बांधणेच्या स्थापत्य कामाचा अंदाजित खर्च | : | रु.३६.८९ कोटी |
| ३ | महात्मा गांधी मार्गावरील टेलिफोन एक्सचेंज जंक्शन येथे उड्डाणपूल बांधणेच्या स्थापत्य कामाचा अंदाजित खर्च | : | रु. ४३.२८ कोटी |
| ४ | एकूण स्थापत्य कामाचा अंदाजित खर्च | : | रु. १७३.०३ कोटी |
| ५ | स्लिप रोड व इतर अनुषंगिक कामांचा अंदाजित खर्च | : | रु. ७.६४ कोटी |
| ६ | एकूण रक्कम (४+५) | : | रु. १८०.६७ कोटी |
| ७ | भौतिक सादिलवार (५%) | : | रु. ९.०३ कोटी |
| ८ | भाववाढ (१०%) | : | रु. १८.०७ कोटी |
| ९ | तज्ञ सल्लागार मानधन | : | रु. ०.२५ कोटी |
| १० | एकूण रक्कम (६+७+८+९) | : | रु. २०८.०२ कोटी |

वरील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे कामाचा सुधारीत अंदाजखर्च रु. २०८.०२ कोटी इतका आहे.

..९/-

४.५ कार्यकारी समितीचे सदस्य श्री. मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग, यांनी ३ उड्डाणपूलांऐवजी एकत्रित सलग उडडाणपूल बांधल्यास तो जास्त उपयोगी ठरेल असे सुचविले. तथापि महानगर आयुक्त यांनी असे निदर्शनास आणले की ,अशा प्रकारचा प्रस्ताव ठाणे महानगरपालिकेने यापुर्वी सादर केला होता परंतु या उन्नतमार्गात काही ठिकाणी प्रस्तावित केलेल्या रॅम्पच्या ठिकाणी स्लीप रस्त्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध नसल्याने उन्नत मार्गाचा प्रस्ताव नाकारण्यात आला होता.

४.६ कार्यकारी समितीचे सदस्य श्री. मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग, यांनी सदर प्रस्तावातील भाववाढीचा खर्च ठाणे महानगरपालिकेने स्वतःच्या निधीतून करणे योग्य ठरेल अशी सूचना केली. तथापि, कार्यकारी समितीचे निमंत्रित सदस्य श्री. श्रीकांत सिंह, प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग यांनी सदरचा प्रकल्प प्राधिकरणाच्या मान्यतेतील समाविष्ट इतर प्रकल्पाप्रमाणेच असल्याने या प्रकल्पाचा देखील सर्व आर्थिक भार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणानेच उचलावा असे सुचविले. कार्यकारी समितीचे सदस्य श्री. देबाशिष चक्रवर्ती, प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग यांनी याबाबत अशी सूचना केली की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे महानगरपालिकांच्या हद्दीत करण्यात येणा-या विकास कामांचा काही प्रमाणात आर्थिक भार स्थानिक महानगरपालिकेने उचलणे योग्य राहील. या विषयावर विस्तृत चर्चा होऊन असे ठरविण्यात आले की, सध्या या प्रकल्पाचा खर्च मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने करावा आणि पुढील भाववाढीचा आर्थिक भार ठाणे महानगरपालिकेने उचलावा तसेच अशा प्रकारच्या प्रकल्पांवरील प्रत्यक्ष कामावरील खर्चाव्यतिरीक्त इतर अनुषंगीक खर्चाचा भार उचलण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी प्राधिकरणाच्या बैठकीत प्रस्ताव सादर करण्यात यावा, तसेच या प्रकल्पाचा एकूण खर्च रु. २०८.०२ कोटी पर्यंतच सिमीत ठेवण्यात यावा.

४.७ कार्यकारी समितीचे निमंत्रित सदस्य श्री. श्रीकांत सिंह, प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग यांनी असे सुचविले की, सदर प्रस्तावाचे Pier Review करण्यात यावे. यावर महानगर आयुक्त यांनी ठाणे महानगरपालिकेस सदरची पडताळणी IIT Mumbai यांच्याकडून करण्याबाबत सूचना देण्यात येईल असे सांगितले.

**<u>निर्णय :</u>** **<u>त्यानंतर, बाब टिप्पणीमधील प्रस्ताव अशंतः मान्य करून कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-</u>**

**<u>ठराव क्र. १२५२ :</u>**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (३) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन,

कार्यकारी समिती याव्दारे विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील लाल बहाद्दूर शास्त्री मार्ग व महात्मा गांधी मार्ग यांवरील उड्डाणपुलांच्या कामांचे रु.२०८.०२ कोटी रकमेच्या सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कमेस मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** पुढील भाववाढीच्या अनुषंगाने होणारा खर्च सध्या ठाणे महानगरपालिकेमार्फत करण्यात यावा व यासबंधीचा धोरणात्मक निर्णय प्राधिकरणाच्या बैठकीत घेण्यात आल्यानंतर त्याप्रमाणे याबाबत पुढील कार्यवाही करण्यात यावी.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** सदर सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कमेच्या मर्यादित राहून देयके अदा करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.५ : मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत सांताक्रुझ चेंबुर जोडरस्त्याच्या सुसाध्यता अभ्यास, सविस्तर अभियांत्रिकी संकल्पचित्रे व आराखडे तयार करण्याकरिता सल्लागाराच्या कार्योत्तर अतिरिक्त खर्चास मंजूरी देणेबाबत.**

५.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सांताक्रुझ चेंबुर जोडरस्ता भाग-१ व २ च्या कामांतर्गत मे. कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस (इंडिया) प्रा.लि. या सल्लागाराची कार्यकारी समितीच्या मान्यतेने डिसेंबर, २००० मध्ये नेमणूक करण्यात आली आहे. मे. कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस (इंडिया) प्रा.लि. यांना कार्यकारी समितीच्या दिनांक ८ नोव्हेंबर, २००७ रोजी झालेल्या २२२ व्या बैठकीतील ठराव क्र. १०८० अन्वये अतिरिक्त कामासाठी वाढीव फी रु. २९.२९ लक्ष (अधिक सेवा कर) मंजूर करण्यात आली. तद्नंतर मध्य रेल्वेने पिअर क्र. ५ चे स्थळ बदलल्याने स्पॅन पिअर ४ - पिअर ५ व पिअर क्र. ५, पिअर क्र. ६ च्या आराखडयामध्ये बदल करावे लागले तसेच काम जलद करण्याच्या दृष्टीने पिअर क्र. ३३,३४, पिअर क्र. ४६,४७ व पिअर क्र. ४८,४९ मधील सर्व गाळयांच्या बीमचे एका बाजूस स्ट्रेसिंग करावे असा निर्णय महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्याकडून घेण्यात आला व यामुळे तीन ते चार महिन्याचा कालावधी बचत होईल असे निदर्शनात आणले. या अतिरीक्त कामासाठी मे. कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस (इंडिया) प्रा.लि. यांनी रु. २९.९१ लक्ष (अधिक सेवाकर) इतक्या रक्कमेची मागणी केली होती. सदर प्रस्ताव मुख्य अभियंता,

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास मंहामंडळ यांच्याकडून तपासण्यात आला असून त्यांनी रु. २९.९१ लक्ष (अधिक सेवा कर) इतकी अतिरिक्त फी देण्यास प्रस्तावित केले. काम जलद होण्याच्या दृष्टीने प्राधिकरणाने दिनांक १२ सप्टेंबर, २०१३ रोजीच्या पत्रान्वये वरील वाढीव फी ला मान्यता दिली. सदर मान्यता ही कार्यकारी समितीच्या मान्यतेच्या अधिन राहून दिलेली आहे. तसेच मध्य रेल्वेच्या हद्दीतील काम जलद होण्याच्या दृष्टीने खालील नमूद केलेली अतिरीक्त कामे मे. कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस (इंडिया) प्रा.लि. यांना प्राधिकरणाचे पत्र दिनांक २० सप्टेंबर, २०१३ अन्वये करण्यास सांगितले.

१) पिअर क्र. ३ - पिअर क्र. ४ व पिअर क्र.७ - पिअर क्र. ८ यांचे गाळयांवर दोन प्रकारे गर्डर लाँचिन स्किम तपासून पहाणे.

२) वरील दोन लाँचिंग स्किम प्रमाणे बेअरींग तपासणे.

३) अस्तित्वातील स्पॅनवर प्रीकास्ट गर्डर बनविणे.

४) पोच मार्गावर प्रीकास्ट बीम बनविणे.

५) ज्या ठिकाणी प्रीकास्ट बीम बनविण्यात येईल त्या ठिकाणच्या बेअरींगची तपासणी करणे.

६) पिअर क्र. ३ -पिअर क्र. ४ व पिअर क्र. ७ - पिअर क्र. ८ वर कंत्राटदाराने सुचविल्याप्रमाणे ३०.८ मीटरच्या गाळयांसाठीचे संकल्पचित्र तपासणे व यासाठी बेअरींगची तपासणी करणे तसेच योग्य ते बदल सुचविणे.

वरील नमूद केलेल्या (६) अतिरीक्त कामासाठी मे. कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस (इंडिया) प्रा.लि. यांनी रु. १०.७० लक्ष (अधिक सेवा कर) इतक्या अतिरिक्त फी ची मागणी केली होती व त्यास प्राधिकरणाने कार्यकारी समितीच्या मान्यतेच्या अधिन राहून मान्यता दिली. अशा एकूण रु. ४०.६१ लक्ष (अधिक सेवा कर) (रु. २९.९१ अधिक सेवा कर + रु. १०.७० अधिक सेवा कर) इतक्या अतिरीक्त फी साठी कार्यकारी समितीच्या कार्योत्तर मान्यतेची आवश्यकता आहे.

५.२ या संदर्भात चर्चा करतांना कार्यकारी समितीचे सदस्य श्री. मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव (१) व श्री. श्रीकांत सिंह, प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग यांनी असे सुचविले की, सदर वाढीव फी साठी मे. कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस यांनी Man-month प्रमाणे दिलेले दर त्यांच्या पुर्वीच्या फीच्या दराशी तपासून पहावेत. सदर दर हे जुने असल्यास त्यावर डब्लु.पी.आय. (WPI) प्रमाणे दर वाढवून तपासावे व या तपासणीचे पूर्ण अधिकार महानगर आयुक्तांना राहतील व त्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली.

**निर्णय : त्यानंतर, उपरोक्त सुचनेच्या अधिन राहून कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १२५३ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (२) व (३) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे मे.कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस (इंडिया) प्रा.लि. यांना सांताक्रुझ चेंबुर जोडरस्त्याच्या सुसाध्यता अभ्यास, सविस्तर अभियांत्रिकी संकल्पचित्रे व आराखडे तयार करण्यासाठी व इतर अतिरिक्त कामासाठी रु. ४०.६१ लक्ष (अधिक सेवा कर) इतकी अतिरिक्त फी अदा करण्यास कार्योत्तर मान्यता व एकूण सुधारीत फीसाठी रु. २१९.०१ लक्ष (अधिक सेवा कर) च्या रक्कमेस मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.६ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या वेगवेगळया ठिकाणी असलेल्या मिळकतींच्या व मालमत्तांच्या व्यवस्थापनाकरीता संस्थेची तीन वर्षे कालावधीसाठी नेमणूक करण्याबाबत.**

६.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाने वेगवेगळया ठिकाणी असलेल्या जमिनींचे, तसेच मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी कार्यकारी समितीच्या दिनांक ०४ मार्च, २०१० रोजी झालेल्या २३०व्या बैठकीमधील ठराव क्र.११५४ व दिनांक ७ जानेवारी, २०११ रोजी झालेल्या २३१व्या बैठकीतील ठराव क्र.११६४ अन्वये मान्यता दिल्यानुसार, दिनांक ०१ फेब्रुवारी, २०११ ते ३१ जानेवारी, २०१४ या कालावधीकरीता एकूण ५ संस्थांची नियुक्ती करण्यात आली होती. प्राधिकरणातर्फे मिळकतींच्या संरक्षणाबाबत प्रत्येक सहा महिन्यांनी आढावा घेण्यात येत असून, त्याप्रमाणे आवश्यकतेनुसार मनुष्यबळ कमी-जास्त करण्यात येते. बाब टिप्पणीच्या **जोडपत्र-ब** मध्ये नमूद केल्यानुसार दिनांक ०१ जानेवारी, २०१४ पासून वेगवेगळया ठिकाणी सदर संस्थांचे मनुष्यबळ नियुक्त करण्यात आलेले आहे.

६.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, प्राधिकरणाने वेगवेगळया ठिकाणी मिळकतींचे संरक्षणार्थ नियुक्त केलेल्या मनुष्यबळाच्या कामकाजामध्ये कालपरत्वे झालेला बदल विचारात घेऊन प्राधिकरणाच्या मिळकतींच्या संरक्षणार्थ मनुष्यबळ पुरविण्याऐवजी, प्राधिकरणाच्या मिळकती व

मालमत्तेच्या व्यवस्थापनाकरिता संस्थांची नेमणूक करण्यासाठी वृत्तपत्रामध्ये दिनांक १५ डिसेंबर, २०१३ रोजी निविदा सुचना प्रकाशित करुन, निविदा मागविण्यात आल्या. सदरच्या निविदा पर्यवेक्षक व मिळकत परिकर पुरविण्याकरिता मासिक दरासाठी व निविदित केलेले दर किमान वेतन अधिनियम, १९४८ अन्वये निर्धारित केलेले किमान वेतन अधिक इतर भत्ते व अनुषंगिक फायदे यापेक्षा कमी असता कामा नये, निविदित केलेल्या दरानुसार सर्व करांसहित (सेवाकरासह) देयक अदा केले जाईल, या महत्वाच्या अटी होत्या. तसेच प्राधिकरणाच्या वेगवेगळया ठिकाणी असलेल्या मिळकतीबाबत आवश्यक असलेले मनुष्यबळ महानगर आयुक्त यांनी नियुक्त केलेली समिती निश्चित करेल व आवश्यक असलेल्या मनुष्यबळाचे निविदित केलेल्या दरानुसार होणारी एकत्रित रक्कम निविदाधारकांस प्रतिमाह अदा केली जाईल. तथापि, निविदाकाराने कामात हलगर्जीपणा केल्यास महानगर आयुक्त ठरवतील त्याप्रमाणे दंडाची आकारणी करण्यात येईल. यामध्ये प्राधिकरणाचे काही नुकसान झाल्यास, संपूर्ण नुकसान भरपाईची तरतूद आहे.

६.३ त्यानंतर महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, किमान वेतन अधिनियम, १९४८ अन्वये व्यापारी आस्थापना उद्योगासाठी कुशल व अर्धकुशल कामगारांचे सर्व अनुषंगिक भत्ते व फायदे / करांसहित किमान वेतन अनुक्रमे पुर्णांकात रु. १२३००/- व रु.११,६५०/- इतके येत आहे. तसेच निविदेतील अटी व शर्तीनुसार किमान वेतन अधिनियम, १९४८ अन्वये वेतन व भत्यात तसेच करात ज्या-ज्या वेळी सुधारणा होईल, त्या-त्यावेळी सदरच्या दरामध्ये त्याप्रमाणे सुधारणा होणार आहे. निविदा सुचनेस अनुसरुन निविदा सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत ९ संस्थांनी निविदा सादर केल्या असून, त्यापैकी (१) मे.ब्रिक फॅसिलीटीज प्रा.लि., (२) मे.क्रिस्टल इंटिग्रेटेड सर्व्हिसेस् प्रा. लि., (३) मे.ईगल हंटर सोलुशन्स् लि. यांच्या निविदा अपात्र ठरल्या आहेत. संरक्षण कार्यात स्पर्धात्मकता येण्यासाठी प्राधिकरण सर्वसाधारणपणे एकापेक्षा अनेक संस्थांची नियुक्ती करीत आहे. सबब निविदमध्ये अशी तरतूद आहे की, जे निविदाधारक लघुत्तम दर सादर करतील, त्यादराने अनुक्रमाने लघुत्तम दर असलेल्या निविदाकारांना नियुक्ती देकार देण्यात येईल व अशा निविदाकाराने लघुत्तम असलेल्या दराने मनुष्यबळ पुरविणे बंधनकारक आहे. सर्व पात्र निविदाकारांनी त्यास संमती दिली आहे. सदरच्या निविदा प्रक्रियेत पर्यवेक्षकासाठी रु. १३,१४६/- व परिकरासाठी रु. १२,४७७/- प्रति महिना इतका लघुत्तम दर प्राप्त झालेला आहे. त्यापैकी पर्यवेक्षकासाठी प्राप्त झालेला दर मे. क्रिस्टल इंटिग्रेटेड सर्व्हिसेस् प्रा.लि. या अपात्र ठरलेल्या संस्थेचा आहे. तरी सदरचे निविदाकार अपात्र ठरत असेल, तरी तो दर लघुत्तम धरण्यात यावा असा प्रस्ताव आहे. सबब सर्व पात्र ठरलेल्या ६ संस्थांची प्राप्त झालेल्या लघुत्तम दराने नेमणूक दिनांकापासून ३ वर्ष कालावधीकरीता नियुक्तीचा प्रस्ताव आहे. सध्या कार्यरत असलेल्या ५ संस्थांचा

कालावधी दिनांक ३१ जानेवारी, २०१४ रोजी संपला आहे. या संस्थांची नियुक्ती कालावधी सध्याची चालू असलेली निविदा प्रक्रिया पूर्ण करुन नव्याने संस्थांची नियुक्ती करेपर्यंत त्यांच्या नियुक्ती कालावधीत मुदतवाढ देण्याचे प्रस्तावित आहे.

**निर्णय : त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १२५४:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे (१) मे.ईगल सिक्युरिटी ॲन्ड पर्सोनेल सर्व्हिस, (२) मे.विशाल प्रोटेक्शन फोर्स, (३) मे. मॉडर्न व्ही. आर. सिक्युरिटी फोर्स (इं) प्रा.लि., (४) मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इं) प्रा.लि., (५) मे. सिंग इंटेलिजन्स सिक्युरिटी प्रा.लि., (६) मे. टॉप्स सिक्युरिटी लि. या संस्थांची रु. १३,१४२/- प्रति पर्यवेक्षक व रु. १२,४७७/- प्रति मिळकत परिकर (Attendant) प्रति महिना सर्व अनुषांगिक भत्ते, सवलती / फायदे व करासहीत व किमान वेतन अधिनियम, १९४८ अन्वये व इतर सर्व अनुषंगिक भत्ते, सवलती / फायदे व करामध्ये होणा-या सुधारणेनुसार सदरचा दर त्याप्रमाणे सुधारीत करण्याच्या अधिन राहून ३ वर्षासाठी निविदेतील अटी व शर्तीवर नियुक्ती करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** कार्यकारी समितीने ठराव क्र.११५४ दिनांक ०४ मार्च, २०१० व ठराव क्र.११६४, दिनांक ७ जानेवारी, २०११ अन्वये प्राधिकरणाच्या मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी नियुक्ती करण्यास मान्यता दिलेल्या संस्थांचा नियुक्ती कालावधी दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१४ पासून उपरोक्त प्रमाणे मान्यता दिल्यानुसार नविन संस्थांची नियुक्ती करेपर्यंत सध्याच्याच अटी व शर्तीवर वाढविण्यास मान्यता देत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** सदर ठरावाची अंमलबजावणी करण्यास व त्यास आवश्यक असलेले मनुष्यबळामध्ये वेळोवेळी आवश्यकतेनुसार फेरफार करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करीत आहे."

**बाब क्र.७ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक इंदू मिल येथील जमिनीवर उभारण्याकरिता सल्लागाराची नेमणूक करणेबाबत.**

७.१ या प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी माहिती देताना असे सांगितले की, शासनाने आपल्या दिनांक १९ मार्च, २०१३ रोजीच्या अधिसूचने अन्वये इंडिया युनाइटेड मिल (इंदू मिल) क्र.६ येथील अंदाजे

४.८४ हेक्टर जागेवर भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य स्मारकाच्या विकासासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४०(१बी) अन्वये विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली आहे. या अनुषंगाने शासनाने दिनांक २० एप्रिल, २०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार सदर भव्य स्मारकाच्या विकासासंदर्भात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने पार पाडावयाच्या जबाबदा-या देखिल विहीत केल्या आहेत.

७.२ त्यानुसार प्राधिकरणाने सदर स्मारकाचा आराखडा तयार करण्याकरीता सल्लागाराची नेमणूक करण्यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सल्लागारांकडून दिनांक ११ जुलै, २०१३ रोजीच्या सूचने अन्वये स्वारस्य अभिव्यक्ती मागविल्या. विहित मुदतीत एकूण १३ सल्लागारांच्या स्वारस्य अभिव्यक्ती प्राप्त झाल्या. प्राधिकरणाने गठित केलेल्या निवड समितीने दिनांक २६ नोव्हेंबर २०१३ रोजी सर्व स्वारस्य अभिव्यक्तींचे मूल्यमापन करुन त्यापैकी १० सल्लागारांकडून त्यांचे संकल्पना प्रस्ताव मागविण्याची शिफारस केली.

७.३ त्याप्रमाणे प्राधिकरणाने सदर १० सल्लागारांकडून दिनांक २२ जानेवारी, २०१४ पर्यंत त्यांचे संकल्पना प्रस्ताव मागविले. विहित मुदतीत सर्व १० सल्लागारांकडून संकल्पना प्रस्ताव प्राप्त झाले. सर्व संकल्पना प्रस्तावांवर प्राधिकरणाने दिलेले विनिर्दिष्ट संकेतांक असून सल्लागाराचे नाव दर्शविले नव्हते व निवड समितीस सदर संकेतांक माहित नव्हते. प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या निवड समितीने दिनांक १६ व १७ फेब्रुवारी, २०१४ रोजी सर्व १० संकल्पना प्रस्तावांचे मूल्यमापन करुन त्यापैकी संकेतांक 7IM8GM (मे.शशी प्रभू ॲण्ड असोसिएटस्) यांच्या संकल्पना प्रस्तावाची निवड करुन त्यांच्या नियुक्तीची शिफारस केली आहे.

७.४ प्रस्तावाच्या विनंती (Requst for Proposal) नुसार निवडलेल्या सल्लागारास त्यांनी दिलेला अंदाजित खर्चाच्या आधारे वास्तुकला परिषद (Council of Architecture) यांच्या प्रमाणकानुसार वाटाघाटीकरुन त्याप्रमाणे व्यावसायिक फी देण्याचे तसेच या वाटाघाटी निष्फळ ठरल्यास द्वितीय क्रमांकावरील सल्लागारासह वाटाघाटी करुन त्यांची नेमणूक करावयाची आहे. याकरीता निवड समितीने संकेतांक 5GM4IM (M/s. Jakob Macfarlane, Paris) यांची द्वितीय क्रमांकावर निवड केली आहे.

७.५ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, निवड समितीच्या शिफारसीनुसार मे. शशी प्रभू ॲण्ड असोसिएटस् यांचे सोबत त्यांनी अंदाजित खर्चाच्या आधारे वास्तुकला परिषद (Council of Architecture) यांच्या प्रमाणकानुसार वाटाघाटीकरुन त्याप्रमाणे ठरविलेल्या व्यावसायिक फी वर त्यांची सदर स्मारकाचा आराखडा तयार करण्याकरीता सल्लागार म्हणून नियुक्ती करण्याचे तसेच त्यांचे सोबत

वाटाघाटी निष्फळ ठरल्यास द्वितीय क्रमांकावरील M/s. Jakob Macfarlane, Paris यांची नियुक्ती करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच, RFP Document मध्ये नमूद केल्याप्रमाणे निवड झालेल्या सल्लागारास रु.१ कोटी एवढे बक्षीस देण्याचे व सदर रक्कम त्यांच्या फी मध्ये समायोजित करुन त्यापैकी रु.१० लाख एवढे सुरुवातीला देण्याचे तसेच, इतर सर्व सल्लागारांना प्रत्येकी रु.५ लाख एवढे बक्षीस देण्याचे प्रस्तावित आहे.

७.६ श्री. मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव-१, नगर विकास विभाग यांनी असे सुचविले की, सदर स्मारक हे एक Living Memorial (जीवित स्मारक) असावे व त्यामध्ये श्रोतृगृह (Auditorium), वाचनालय इत्यादी सोयी असाव्यात. यावर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, निवड केलेल्या दोन्ही संकल्पना प्रस्तावांमध्ये सदर सोयींची तसेच मोठया प्रमाणावर सार्वजनिक समुदायाकरीता प्लाझाची देखिल तरतूद आहे.

७.७ श्री. मनुकुमार श्रीवास्तव यांनी प्राप्त झालेल्या सर्व संकल्पना प्रस्तावांचे Intellectural Property Rights (IPR) प्राधिकरणाकडे असतील किंवा कसे याबाबत विचारणा केली. यावर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, याबाबत RPF Document मध्ये तरतूद असून त्यानुसार सर्व संकल्पना प्रस्तावांचे प्रकाशन व प्रदर्शन प्राधिकरण करु शकते.

**निर्णय :** **वरील चर्चेनंतर कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १२५५ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** विषयांकित स्मारकाचे महत्व व संवेदनशीलता लक्षात घेता कार्यकारी समिती याद्वारे निवड समितीने शिफारस केलेल्या मे. शशी प्रभू ॲण्ड असोसिएटस् यांची सदर स्मारकाचा आराखडा तयार करण्याकरीता सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यास प्राधिकरणाची मान्यता घेण्याची शिफारस करीत आहे. तसेच, मे. शशी प्रभू ॲण्ड असोसिएटस् यांचे सोबत वाटाघाटी निष्फळ ठरल्यास द्वितीय क्रमांकावरील M/s. Jakob Macfarlane, Paris यांची नियुक्ती करण्यास प्राधिकरणाची मान्यता घेण्याची शिफारस करीत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरीलप्रमाणे वाटाघाटी करुन सल्लागाराची नेमणूक करण्याकरीता प्राधिकरणाची मान्यता घेण्यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** निवड झालेल्या सल्लागारास रु.१ कोटी एवढे बक्षीस देण्यास व RFP Document प्रमाणे सदर रक्कम त्यांच्या फी मध्ये समायोजित करुन त्यापैकी रु.१० लाख एवढे सुरुवातीला देण्यास कार्यकारी समिती याद्वारे मान्यता देत आहे.

**"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** निवड समितीने इतर सर्व सल्लागारांच्या प्रयत्नांची प्रशंसा केली असल्याने RFP Document मध्ये नमूद केल्याप्रमाणे इतर सर्व सल्लागारांना प्रत्येकी रु.५ लाख एवढे बक्षीस देण्यास कार्यकारी समिती याद्वारे मान्यता देत आहे.

**"पुढे असा ठराव करण्यात येत आहे की,** या अनुषंगाने आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.८ : अंबरनाथ नगरपरिषदेच्या जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नगरोत्थान अभियानाअंतर्गत (JNNURM) मंजूर झालेल्या वाढीव व विस्तारित भुयारी गटार योजनेसाठी कर्ज सहाय्य देणे.**

८.१. या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, अंबरनाथ क्षेत्रात सद्यस्थितीत असलेल्या नागरी मूलभूत सुविधांचा तुटवडा व भविष्यात त्या सुविधा पुरविण्यासाठी वाढीव गरज लक्षात घेता तसेच लोकसंख्येत होणारी वाढ नजरेत ठेवून, अंबरनाथ नगरपरिषदेने वाढीव व विस्तारित भुयारी गटार योजना हा प्रकल्प हाती घेतला आहे. अंबरनाथ नगरपरिषदेची रु. १०९.४२ कोटीची वाढीव व विस्तारित भूयारी गटार योजना "जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नगरोत्थान अभियान" (JNNURM) अंतर्गत मंजूर झाली असून त्यासाठी वितरित करण्यात येणा-या केंद्र व राज्य शासनाच्या हिश्याच्या रु. ५४.७१ कोटी अनुदानापैकी डिसेंबर, २०१३ अखेरपर्यंत रु. १३.६८ कोटी एवढी अनुदान रक्कम शासनामार्फत वितरित करण्यात आली आहे. सदर प्रकल्पाच्या कामाबाबतचे कंत्राटदारास कार्यादेश देण्यात आले आहे. अंबरनाथ नगरपरिषदेच्या वाढीव व विस्तारित भूयारी गटार योजनेची निविदा रक्कम रु. १२६.०२ कोटी पर्यंत वाढली आहे. त्यामुळे, अंबरनाथ नगरपरिषदेचा सदर प्रकल्पाच्या खर्चातील हिस्सा रु. ५४.७१ कोटींवरुन (रु. १०९.४४ कोटीच्या ५०%) रु. ७१.३२ कोटी इतका झाला आहे. त्यातील रु. १५ कोटी इतकी रक्कम नगरपरिषद स्वतःच्या स्त्रोतातून खर्च करणार असून उर्वरित रु. ५६.३२ कोटी (रु. ७१.३२ कोटीच्या ७८.९६%) रक्कम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडुन कर्ज स्वरुपात मिळणेस विनंती केली आहे.

८.२ त्यानंतर महानगर आयुक्त यांनी अंबरनाथ नगरपरिषदेच्या वित्तीय क्षमतेबाबत असेही सांगितले की, सदर कर्ज प्रस्तावासाठी अंबरनाथ नगरपरिषदेचे वित्तीय स्थितीचे विश्लेषण (Appraisal)

नगरपरिषदेने विनंती केल्याप्रमाणे रु. ५६.३२ कोटी (नगरपरिषद हिस्स्याच्या ७८.९६%) रक्कम गृहीत धरुन करण्यात आले आहे. सदर प्रकल्प हा अ-वाणिज्यिक स्वरुपाचा असल्यामुळे व्याजदर ७% द.सा.द.शे. व कर्ज परतफेड कालावधी १५ वर्ष (कुठल्याही मोरॅटोरियम शिवाय) या प्रमाणे प्रस्तावित केला आहे. सदर कर्ज मुंबई नागरी विकास प्रकल्प -फिरता निधीतून (MUDP-RF) देण्याचे प्रस्तावित आहे. प्राधिकरणामार्फत प्रस्तावित रु. ५६.३२ कोटी कर्जाचे वितरण लक्षात घेता नगरपरिषदेवर रु. ६.५८ कोटी इतका अतिरिक्त कर्जपरतफेडीचा बोजा दरवर्षी राहील.

८.३ तसेच महानगर आयुक्तांनी अंबरनाथ नगरपरिषदेच्या मूल्यांकन अहवालाबाबत असे स्पष्ट केले की, नगरपरिषदेला रु. ५६.३२ कोटीचे कर्ज कोणत्याही विशेष अटी (जसे मोरॅटोरियम, भांडवली खर्चावरील बंधने) शिवाय देता येईल व नगरपरिषद प्राधिकरणाच्या रु. ५६.३२ कोटी एवढया कर्जाची परतफेड करण्यास सक्षम आहे. या आधारे नगरपरिषदेची गुणोत्तर उपयोगिता (Operating Ratio) (महसुली जमा/महसुली खर्च) वर्ष २०१३-१४ ते वर्ष २०२७-२८ या कालावधीत जास्तीत जास्त ०.८२ (एक पेक्षा कमी असणे अपेक्षित) आहे तर ऋण गुणोत्तर सेवाप्राप्ती (Debt Servicing Capacity Ratio) (निव्वळ महसूली जमा/कर्जपरतफेड) कमीतकमी ४.५४ (१.५ पेक्षा जास्त असणे अपेक्षित) असल्याचे आढळते. हे वित्तीय स्थितीच्या दृष्टीने स्वीकारार्ह आहे.

८.४ त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधीच्या कर्ज धोरणानुसार जास्तीत जास्त प्रकल्प किंमतीच्या ९०% कर्जाला मान्यता देऊ शकतो असे प्रस्तावित करण्यात येते कि, अंबरनाथ नगरपरिषदेला वाढीव व विस्तारित भुयारी गटार योजनेसाठी, नगरपरिषदेच्या हिस्सासाठी रु. ५६.३२ कोटीचे कर्ज (म्हणजे रु. ७१.३२ कोटीच्या ७८.९६%) मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधीतून देण्यात येईल. उर्वरित रक्कम रु. १५.०० कोटी (रु. ७१.३२ कोटीच्या २१.०४%) नगरपरिषदेने स्वतःच्या स्त्रोतातून खर्च करावे असे गृहित धरण्यात आले आहे.

महानगर आयुक्त यांनी प्रस्तावित कर्जाच्या अटी व शर्तीबाबत असेही सांगितले की, प्राधिकरणाच्या विद्यमान धोरणाप्रमाणे अंबरनाथ नगरपरिषदेच्या प्रकल्पासाठी द.सा.द.शे. ७% व्याज आकारण्याचे प्रस्तावित करण्यात येत असून परतफेडीचा कालावधी १५ वर्षे तसेच कर्ज परतफेडीतील सुटीचा कालावधी न देता सदर कर्ज हे वर्ष २०१४-१५ ते २०१६-१७ या कालावधीत झालेल्या खर्चावर प्रतिपूर्ती तत्वावर वितरित करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच कर्जाचा प्रत्येक हप्ता वितरित झाल्यानंतर त्वरित कर्ज परतफेड सुरु होईल असे प्रस्तावित आहे. तसेच बाब टिपण्णीतील परिच्छेद क्र. १२ व १३ मध्ये प्रस्तावित केलेल्या प्रमुख व इतर अटी व शर्तीच्या अधीन राहून कर्ज देण्यात येईल असे महानगर आयुक्त यांनी स्पष्ट केले.

८.५ महानगर आयुक्त यांनी असे प्रस्तावित केले की, अंबरनाथ नगरपरिषदेच्या "जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नगरोत्थान अभियान" (JNNURM) अंतर्गत केंद्र व राज्य शासनाने मंजूर केलेल्या वाढीव व विस्तारित भूयारी गटार योजनेवर नगरपरिषदेमार्फत करावयाच्या रु. ७१.३२ कोटी एवढया खर्चापैकी नगरपरिषदेने मागणी केलेल्या रु. ५६.३२ कोटी कर्जाची विनंती मान्य करुन, मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधीतून अंबरनाथ नगरपरिषदेस रु. ५६.३२ कोटी (रु. ७१.३२ कोटीच्या ७८.९६%) इतकी कर्ज रक्कम द.सा.द.शे. ७% व्याजदर आकारुन १५ वर्षाच्या कर्ज परतफेडीच्या कालावधीसाठी कर्ज परतफेड सुटीचा कालावधी न देता देण्यास मान्यता द्यावी.

८.६ या विषयाच्या चर्चेदरम्यान, मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी आतापर्यंत प्राधिकरणामार्फत देण्यात आलेल्या कर्ज रक्कमेच्या परतफेडीच्या कामगिरीबद्दल विचारणा केली. त्यावर महानगर आयुक्त यांनी असे स्पष्ट केले की, प्राधिकरणामार्फत आजतागायत देण्यात आलेल्या सर्व कर्जाची परतफेड वेळेत सुरु आहे. तसेच अंबरनाथ नगरपरिषदेची वित्तीय क्षमतेच्या विश्लेषणाच्या आधारे सदर नवीन कर्ज घेण्याची क्षमता असल्याचे स्पष्ट केले.

**निर्णय : त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला: -**

**ठराव क्र. १२५६:**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम २१ अ अन्वये प्राधिकरणास प्राप्त झालेल्या व त्यास यासंबंधी सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याव्दारे अंबरनाथ नगरपरिषदेच्या "जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नगरोत्थान अभियान" (JNNURM) अंतर्गत मंजूर झालेल्या वाढीव व विस्तारित भुयारी गटार योजनेसाठी अंबरनाथ नगरपरिषदेने केलेली कर्जाची विनंती मान्य करुन मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधीतून अंबरनाथ नगरपरिषदेस रु.५६.३२ कोटी इतकी कर्ज रक्कम द.सा.द.शे ७% व्याजदराने १५ वर्षाच्या कर्ज परतफेडीच्या कालावधीसाठी कर्ज परतफेड सुट्टीचा कालावधी न देता बाब टिप्पणीत प्रस्तावित केलेल्या अटींच्या अधीन राहून देण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** कर्जाची रक्कम, व्याजदर आणि कर्ज परतफेडीचा कालावधी या अटींव्यतिरिक्त एस्क्रो खात्यासंबंधी तपशील व कर्ज परतफेडीतील सुट्टीचा कालावधी निश्चित करुन, प्रकल्प अंमलबजावणी कालावधी, आगाऊ कर्ज सहाय्य देणे तसेच कर्जाच्या इतर अटी व शर्तीमध्ये आवश्यक सुधारणा करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.९ : दिनांक ३१ डिसेंबर, २०१३ रोजी संपणा-या त्रैमासिक कालावधीचे लेखे.**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३१ डिसेंबर, २०१३ रोजी संपणा-या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली.

**निर्णय : प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद घेऊन लेख्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली.**

**बाब क्र.१० : प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल दिनांक ०१ नोव्हेंबर, २०१३ ते दिनांक ३१ जानेवारी, २०१४**

दिनांक ०१ नोव्हेंबर, २०१३ ते दिनांक ३१ जानेवारी, २०१४ हया कालावधीत प्राधिकरणाने शासनाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार विविध बँका/वित्तीय संस्था यामध्ये केलेल्या गुंतवणूकीची माहिती महानगर आयुक्त यांनी समितीपुढे सादर केली.

**निर्णय : सदरहू गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

**बाब क्र.११ : प्राधिकरणाच्या विविध प्रकल्पांची प्रगती आणि सद्यस्थिती दर्शविणारे सादरीकरण.**

वेळेअभावी सादरीकरण आगामी बैठकीत करण्यात यावे असे ठरले.

त्यानंतर, मा. अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

----------xox----------